**पोलीस उप आयुक्त, कार्यालय**
**गुन्हे शाखा, पिंपरी चिचवड.**
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे.

## प्रेसनोट दिनांक ०७/०३/२०२५

### अवैधरित्या रक्तचंदनाची वाहतुक करणाऱ्या आणखी तीन इसमांना अटक

श्री.विनय कुमार चौबे सो पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी गुन्हे शाखेकडील पथक व युनिट यांना पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे हददीत अवैध धंदयावर कारवाई करणे बाबत सुचना असता तदअनुषंगाने श्री. संदीप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, पिंपरी चिंचवड व श्री. डॉ. विशाल हिरे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे १, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे विरोधी पथकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजय ढमाळ, यांनी व त्यांचे पथकाने दिनांक ०२/०३/२०२५ रोजी गुप्त बातमी दारामार्फत मिळालेल्या माहितीचे आधारे पुणे - मुंबई एक्सप्रेस वे वरती शिरगांव पोलीस स्टेशन हददीत उर्से टोल नाका येथे एमएच/४३/वाय/०७४२ या कंटेनर मध्ये अवैध रित्या रक्तचंदनाच्या लाकडाची वाहतुक करणा-या वाहनावर छापा घालून, सदर कंटेनर मधून ११ टन ४९० किलोग्रॅम वजनाचे ८ कोटी ६१ लाख ७५ हजार किमंतीचे रक्तचंदनाचे लाकडांची ओडके मिळुन आलेने सदर वजनाचे व किंमतीचे रक्तचंदनाचे लाकडांची ओडके व ५० लाख रुपयांचा कंटेनर ट्रेलर असा एकुण ९ कोटी ११ लाख ९१ हजार रु चा मुद्देमाल जप्त केला होता त्याअनुषंगाने आरोपी नामे १. राजाराम गंगाराम गायखे वय ३७ वर्षे रा. काळेवाडी, ता. पारनेर,जि. अहिल्यानगर २. हरप्रितसिंग धरमसिंग बदाना वय ४२ वर्षे रा. विराज रेसिडेन्सी वेस्ट ठाणे, यांचे विरुध्द शिरगाव परंदवाडी पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं ५८/२०२५ अन्वये भा.न्या.सं कलम ३०३(२), ३(५), भारतीय वन अधिनियम कलम २६, ४१, ४२ सह महाराष्ट्र खाजगी वृक्षतोड, अधिनियम १९६४, सुधारणा कलम ३, ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असता सदर इसमाना गुन्हयामध्ये अटक करण्यात आली होती.

सदर गुन्हयाचा पुढील तपास हा दिनांक ०४/०३/२०२५ रोजी मालमत्ता गुन्हे पथकाकडे वर्ग करण्यात आला होता. मालमत्ता विरोधी पथकाने यामध्ये सखोल तपास करुन सदर गुन्हयात मुख्य सहभाग असलेले खालील तीन आरोपी यांचे नांवे निष्पन्न करुन त्यांची गोपनीय माहिती काढून आरोपी नामे १. श्रीकांत शंकर भिलारे, वय ३८ वर्षे, रा. सानपाडा, नवी मुंबई, २. इंद्रावन बाबाजी माने, वय ३४ वर्षे, रा. कामोठे, नवी मुंबई. ३. दिपक पोपट साळवे, वय ४२ वर्षे, रा. पारनेर आहिल्यानगर या आरोपींना दिनांक ०६/०३/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदर उल्लेखनीय कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री. विनयकुमार चौबे सो. पिंपरी चिंचवड, मा. पोलीस सह आयुक्त श्री. शशिकांत महावरकर, मा. संदीप डोईफोडे पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, मा. श्री डॉ. विशाल हिरे, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे १, यांच्या मार्गदर्शनाखाली मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विजय ढमाळ, पोलीस उप निरीक्षक भरत गोसावी, पोलीस अंमलदार महेश खांडे, आशिष बनकर, नितीन लोखंडे, पोहवा गडदे, पोना गणेश कोकणे, अमर कदम, हर्षद कदम, अमोल गोरे, मोहसीन आत्तार, यांनी केली आहे.

**(संदीप डोईफोडे)**
पोलीस उप आयुक्त (गुन्हे)
पिंपरी चिंचवड